# तर्कतीर्थांची जातिसंस्थाविषयक मीमांसा

**विशाल व्यंकट रणखांब, संशोधक विद्यार्थी (पीएच.डी) राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे**

जातिव्यवस्था हे भारतीय समाजव्यवस्थेचे अविभाज्य अंग आहे. जातीचा प्रभाव केवळ हिंदू समाजावरच नव्हे तर जातिव्यवस्था सैद्धांतिकदृष्ट्या न मानणाऱ्या भारतातील इतर समाजावरही पडला आहे. म्हणून जातिव्यवस्था हे परंपरागत भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. हिंदू समाजाचे प्राचीन काळापासूनचे एक वैशिष्ट्य म्हणून जातीचा उल्लेख केला जातो. हिंदू समाजव्यवस्थेचे स्पष्टीकरण ज्यावेळी प्रथम सुरु झाले. तेंव्हा अत्यंत प्रकर्षाने जाणीव झाली की, हिंदू समाज हा जातीजातींचा बनलेला आहे. त्यामुळे हिंदूच्याजातिव्यवस्थेचा विचार तपशिलाने सुरु झाला. काहींनी हिंदू समाजाचे पूर्ण आकलन व्हावे म्हणून, तर कोणी हिंदू समाजव्यवस्थेतील दोष ठळकपणे स्पष्टकरण्यासाठी, तर कोणी या दोषांचे निर्मूलन व्हावे म्हणून जातिव्यवस्थेचे विवेचन केले. अनेक पाश्चिमात्य व भारतीय अभ्यासकांनी जात म्हणजे काय, जातिव्यवस्थेची निर्मिती कशी झाली, जातिव्यवस्थेमुळे हिंदू समाजावर कोणते परिणाम झाले असावेत अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. जातिव्यवस्थेविषयी झालेल्या या सर्व विचारमंथनामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील विचारवंतांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

महाराष्ट्रातील थोर विचारवंत, संस्कृत पंडित, कोषकार म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सांस्कृतिक मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून जातिसंस्थेकडे पाहत होते. त्यांनी लिहिलेल्या शुध्दिसर्वस्वम् (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदू धर्माची समीक्षा (१९४१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (१९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिध्दांत (१९७३), तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (१९८२), हिंदू धर्माची समीक्षा आणि सर्वधर्म समीक्षा (१९८४) आदी ग्रंथातून त्यांचे विचार प्रतिबिंबित झाले आहेत.

**तर्कतीर्थांनी केलेली जातीची व्याख्या :**

''वर्णव्यवस्थेत वर्ण म्हणून एक चिरंतन स्थान प्राप्त झालेला कुलसमुह, या कुलसमुहास 'जाति'ही संज्ञा आहे.''(जोशी; १९८२:३४९-३५०) म्हणजेच तर्कतीर्थांच्या मते, 'वर्ण आणि जाति हे दोन समानार्थक शब्द आहेत; एकमेकांचे पर्याय आहेत.'

तर्कतीर्थ म्हणतात, 'जाति' शब्दाचा मुळ अर्थ जन्म. अशा कुलसमूहांपैकी एका कुळात जो जन्मतो, त्याची ती जात ठरते.(जोशी; १९८२: ३५०) म्हणजेचवर्णव्यवस्थेतील विशिष्ट श्रेणी म्हणून मान्य असलेली जात ही समान अधिकाराची असते. समान अधिकार असलेल्या अशा एकेका जातीत अनेक उपजाती किंवा पोटजाती असतात. त्यांना उपजाती किंवा पोटजाती न म्हणता जाति हीच संज्ञा प्राप्त होते, असे तर्कतीर्थ सांगतात. (जोशी; १९८२:३५०)

**जातिसंस्थेची उत्पत्ती :**

तर्कतीर्थांच्या मते, 'हिंदू समाजाची सुमारे गेली तीन हजार वर्षे स्थिरावलेली रचना म्हणजे जातिसंस्था होय.' (जोशी; १९८२:३४७) आजपर्यंत अनेक पश्चिमी विद्वानांनी, समाजशास्त्रज्ञांनी व आधुनिक भारतीय सशिक्षितांनी जातिसंस्थेच्या उगमाच्या अनेक उत्पत्ती सांगितल्या आहेत. रिस्ले या पश्चिमी विद्वानानेजातिसंस्थेच्या उगमासंदर्भात वंशवादी उत्पत्तीला महत्त्व दिले. इबेट्सन यांनी 'ट्राइब्ज'म्हणजे भारतातील व बाहेरील परस्परांशी सामाजिकरित्या संघटित न झालेल्या व सांस्कृतिक मेलन न झालेल्या भिन्नभिन्न जमाती वा टोळ्या या जातिसंस्थेचे उगमस्थान होय, असे प्रतिपादिले. नेसफील्ड यांनी भिन्नभिन्न व्यवसाय हे जातिसंस्थेचे उगमस्थान ठरविले. राजांचे किंवा सत्ताधाऱ्यांचे धार्मिक कर्मकांड यामुळेजातिसंस्था उत्पन्न झाली असे मानवजातिशास्त्रज्ञ होकार्ट यांनी सांगितले. इग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाचे प्राध्यापक हटन व पॅरिसयेथील मानवजातिशास्त्रज्ञ ल्वी द्धूमाँ यांनी भिन्नभिन्न जमातीच्या पवित्र व अपवित्र, पुण्य व पाप यासंबंधी असलेल्या भिन्नभिन्न श्रद्धांचा प्रभाव व त्या श्रद्धांना मान्यता देण्याची प्रवृत्ती यामुळे जातिसंस्था निर्माण झाली असे सांगितले आहे. (जोशी; १९८२:३५१)

तर्कतीर्थ म्हणतात, जातिसंस्थेची अंगभूत तीन लक्षणे दिसतात. १) भिन्नभिन्न कुलसमुहांना पृथक् कुलपरंपरेने प्राप्त झालेला परस्परांपासूनचा पृथक्पणा२) या पृथक्पृथक् कलसमुहांचा परस्परोपकारक श्रमविभाग वा भिन्न व्यवसाय ३) उच्चनीचव स्थिर अशी श्रेणीबद्ध रचना. या अंगभूत तीन लक्षणांनी युक्त अशा जातिसंस्थेचे व त्याबरोबरच त्यातील सर्व जाती व उपजाती यांचे समग्र चित्र प्रथम वेदोत्तरकाळी इ.स.पू. आठव्या-सातव्या शतकात प्रकटझालेले दिसते.तत्पूर्वी व त्यानंतर त्याचित्रात अनेक लहान-मोठे फेरबदल झाले. खालच्या मानलेल्या जाती किंवा त्यातील काही व्यक्ती उच्च व्यवसायात शिरुन किंवा आर्थिक व राजकीय प्रभाव आणि सामर्थ्य मिळवून किंवा आचारविचारांमध्ये वरच्या श्रेणीचे मोठ्या प्रमाणात अनुकरण करुन हळूहळू वरच्या श्रेणीत शिरल्या;त्याचप्रमाणे वरच्या श्रेणीत असलेल्या जातिजमाती किंवा काही विशिष्टव्यक्ती खालच्या दर्जाचे मानलेले व्यवसाय करत असल्यामुळे किंवा आर्थिक व राजकीय सामर्थ्यअनेक पिढ्यापर्यंत कमी होत गेल्यामुळे अथवा अधःपात झाल्यामुळे अथवा उच्च धार्मिक संस्कारांचा अनेक पिढ्यापर्यंत लोप झाल्यामुळे वरची श्रेणी गमावून बसून खालच्या जाती म्हणून स्थिरावल्या. वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था स्थिरावल्यानंतर भारताबाहेरुन भारतात मुसलमानपूर्वकाळीज्या जमाती येत गेल्या, त्यांचाही सांस्कृतिक दर्जा, राजकीय सामर्थ्य किंवा व्यवसायविषयक विशेष ज्ञान असेल त्याप्रमाणे येथील वर्णव्यवस्थेत वा जातिव्यवस्थेत समावेश होत गेला. (जोशी; १९८२:३५१)

थोडक्यात वेदकाळापासून इ.स. १८ व्या शतकापर्यंतच्या कालावधीत जातीसंस्था निर्माण झाली, वाढली, स्थिरावली व त्यात फेरबदलही झाले.तिला स्पष्टस्वरुप वेदकाळीच आले आहे.या काळात व्यवसाय, संपत्ती, आचार-विचार, राजकीय सामर्थ्य याआधारे म्हणजेच गुणकर्मानुसारजात ठरत असे किंवा जातीय स्तर बदलता येत असे. म्हणजेच जातीसंस्था लवचिक स्वरुपाची होती, अशी भूमिका तर्कतीर्थ मांडतात.

**तर्कतीर्थांचाजातिसंस्थाविषयक दृष्टीकोन :**

तर्कतीर्थांच्या मते, ''जातिसंस्था ही शारीरिक अर्थी वंशवादी समाजसंस्था नाही, तर ती एक सांस्कृतिक संस्था आहे.'' (जोशी; १९८२:३५३) हे स्पष्टकरताना तर्कतीर्थआधुनिक वंशशास्त्राच्या आधारे जातिभेदाचे समर्थन करणाऱ्या सनातनी विचारांचा परखड शब्दात

समाचार घेतात. तर्कतीर्थ म्हणतात, आधुनिक शास्त्रातील मानववंशभेदाचा आणि चातुर्वर्ण्य व जातिभेद या संस्थेतील वंशकल्पनांचापरस्परसंबंध आहे. असे काही लोक प्रतिपादन करितात, पण ते बरोबर नाही. आधुनिक शास्त्रातील मस्तिष्करचना, नाकाचे आकार, चेहरापट्टीचे प्रकार, डोळ्यांचे विशेष,केसांचे फरक, त्वचेच्या रंगाचे वैविध्य, रक्ताचे चार भेद, उंची इत्यादी शरीरलक्षणांचा विचार करुन वंशभेद ठरविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मस्तिष्क, चेहरेपट्टी, नाक, डोळे, केस, कातडीचा रंग, उंची व रक्त यांच्यातील जे प्रकार वंशशास्त्राने ठरविले आहेत, त्यांच्यात परस्परसापेक्षता फार कमी आहे. काळ्या, गोऱ्या, पिवळ्या, गुलाबी किंवा पिंगट कातडीच्या माणसांच्या डोळ्यांची रचना किंवा मस्तिष्क त्या-त्या रंगाप्रमाणे अमुक प्रकारचे असते, असे ठरविता येत नाही. याचप्रमाणे इतरही विशेषांचे बाबतीत हेच कमीजास्त प्रमाणात सांगता येईल. उष्णता, शैत्य, हवा, पाणी, अन्न, श्रमाचे व व्यवसायांचे प्रकार इत्यादी अंतर्बाह्य परिस्थितीमुळे शारीरलक्षणांत बदल होतो, असे आढळून येऊ लागले आहे. वंशभेदाचेमहत्वाचेलक्षण मस्तिष्करचना होय. परंतु, चार-सहा पिढ्यांत तिच्यातही देशकालपरिस्थितीमुळेफरक पडतो. असे फ्रांझ बोआस या अमेरिकन मानवजातिशास्त्रज्ञाने व इतरही पंडितांनी अनेक मानवगटांच्या अभ्यासावरुनदाखवून दिले आहे. (जोशी; १९८४:१५८)केसांचा रंग, कुरळेपणा, लांबसडकपणा, रखरखीतपणाकिंवामार्दव, कातडीचा गोरेपणा, काळेपणा, तांबडेपणा किंवा पिवळेपणा, मस्तकांचे निरनिराळे आकार, नाक अणकुचिदार, सरळ, उंच, लठ्ठ, चपटके, पसरट, फुगीर किंवा गरुडबाकाचे, रक्ताचे चार भेद यांचा व चातुर्वर्ण्यातील गुणकर्मविभागांचा काही संबंध नाही. वरील कोणत्याहीशारीरलक्षणांनी श्रुतिस्मृत्युक्त ब्राम्हणत्व, क्षत्रियत्व, वैश्यत्व किंवा शुद्रत्व निश्चित करणे अशक्य आहे. या शारीरीक लक्षणांशी श्रुतिस्मृत्युक्तमानसिक गुणांचासंबंधही काही ठरलेला नाही. (जोशी; १९८४:१५९)

तर्कतीर्थ म्हणतात, आर्य म्हणवून घेणाऱ्यांना आपल्या वंशवरिष्ठत्वाचा फार गर्व आहे, परंतु आर्यसंस्कृती व विशिष्टलक्षणांचा वंश यांचे काही नाते नाही. आर्यसंस्कृती ज्या लोकसंघात आढळते, त्यांच्यातील वंशवैशिष्ट्य एकजिनसी आहे असेमुळीच ठरविता येत नाही. एवढेच नव्हे तर मानववंशशास्त्रीय तत्त्वाप्रमाणे अनेक प्रकारचे वंश आर्यसंस्कृतीच्या गटात सहज आढळतात. ज्यांच्यांत महान वैदिक घराणी अद्याप आहेत ते तेलगू ब्राम्हण व कोचीन प्रांतातील शुद्र संस्कृतीचे कल्ल व इल्लुव यांच्यात वंशसादृश्य शाबित करता येते. या तेलगू ब्राम्हणांच्यावंशासारखेच उत्तर हिंदूस्थानातील व पंजाबमधील चांभार वगैरे लोक आहेत.गुजराथेतील नागर ब्राम्हण, बंगाली कायस्थ व कानडी ब्राम्हणेत्तर यांच्यातही वंशसाम्य आहे.वायव्य सरहद्दीवरील व हिमालयातील काफिर आणि पठाण, पंजाबी, शाख आणि संयुक्त प्रांतातील काही ब्राम्हणगण यांच्यात वांशिक ऐक्याची लक्षणे आढळतात.महाराष्ट्रातील चित्पावनांत पठाण व काफीर यांच्यातील गुलाबी रंग व घारेपणा सापडत असला, तरी त्यांच्या मस्तिकाची रचना, उंची व इतर वंशलक्षणे महाराष्ट्रातील देशस्थ, कराडे, मराठे, महार इत्यादी बहुजनसमाजाच्या वंशाचीच आहेत. वंशदृष्ट्या महाराष्ट्रातील बऱ्याचशा जातींची जी समान लक्षणे आहेत, तीच चित्पावनांतही आहेत. (जोशी; १९८४:१५९-१६०)

तर्कतीर्थांच्या मते, चातुर्वर्ण्याचा वंशशास्त्रोक्त वंशाशी काही संबंध नाही. भौतिक साधने व भौतिकउत्पादनपध्दती बदलली की, संस्कृती बदलते. एखाद्या मानववंशास लोखंडाचा शोध त्याच्या भौगोलिक परिस्थितीने झाला नाही व दुसऱ्या मानववंशास मुबलक प्रमाणात लोखंड सापडले, तर लोखंड सापडलेल्या वंशाची शस्त्रास्त्रे व लष्करी व्यवस्था लोखंडामुळे अत्यंत सुधारते आणि तो वंश आपल्यापेक्षा शूर, धाडसी, मेहनती, लोहरहित वंशाचा पराभव करुन, त्या वंशास आपल्या अधिपत्याखाली आणून त्यांना शुद्र संस्कृतीचे बनवू शकतो. पुष्कळ क्षत्रिय मराठे इंग्रजी राज्यात क्षात्रत्व नष्टहोऊन शुद्र झाले आहेत. याचे कारण इंग्रज हे वरच्या दर्जाचेक्षत्रिय होते, हे नव्हे; तर इंग्रजांची लष्करी संस्कृती म्हणजे शस्त्रास्त्रे व युद्धपद्धती अधिक सुधारलेली होती. इतिहास सांगतो की, घोडदळाने लढणारे मानवगट घोडदळ माहित नसलेल्या शूर मानवसमाजांना जिंकून व शुद्र बनवून स्वतः राजन्य व ब्राम्हण बनले. ब्राम्हणांची गुणकर्मेअसलेले लोक परिस्थितीत बदल झाल्यास, क्षत्रिय पेशाचे किंवा शुद्रकर्मी बनतात. उत्तर हिंदूस्थानातील विशेषतः संयुक्तप्रांत, पंजाब, रजपुताना व सिंधप्रांत यातील ब्राम्हण मोठ्या प्रमाणात शुद्रकर्मी बनलेले आज दिसत आहेत. ही केवळ अपवादात्मक उदाहरणे नाहीत. मोठ-मोठे मानवगट एका तऱ्हेच्या वर्णसंस्कृतीचा व धंद्याचा त्याग करुन अन्य वर्णांची संस्कृती व धंदे पत्करतात.वंशस्वभावांचा उत्कर्षापकर्ष किंवा वंशसंकर ही याची कारणे मुळीच नव्हेत. राजकीय व आर्थिक परिस्थितीमुळे ही स्थित्यंतरे घडतात, असे सहज सिध्द करता येते. (जोशी; १९८४:१६०-१६१)

तर्कतीर्थ म्हणतात, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र यांची गुणकर्मे स्वाभाविक जननसिद्ध विभक्त वंशावर अवलंबून आहेत. यास एकही प्रमाण मानवजातीच्याइतिहासात सापडत नाही. एकाच मानववंशाच्या गटात नव्यासांस्कृतिक परंपरा उत्पन्न होतात व जुन्या बदलतात, असेच इतिहास सांगतो. या गोष्टींचा नैसर्गिक भिन्न वंशाशी काही संबंध नाही; आणि ही गुणकर्मे परस्पर विरुद्धही नाहीत. ज्ञान, संयम, शौर्य, शरीरश्रम, सहिष्णुता व धनार्जनशीलता या गुणाचा संगम झालेली हजारो माणसे असतात. शौर्य हा क्षात्र गुण, ज्ञान व संयम हे ब्राम्हणगुण, धनार्जनशीलता हा वैश्यगुण व शरीर श्रमप्रियता हा शुद्रगुण होय, असे म्हटले तर त्यांच्यात परस्परविरोध असतो, असे मुळीच सिध्द होणे शक्य नाही. एवंच चातुर्वर्ण्यव्यवस्था व जातिसंस्था वंशशास्त्रावर उभारलेली व्यवस्था आहे, यास एकही शास्त्रीय प्रमाण नाही. (जोशी; १९८४:१६१)

जातिसंस्थाविषयक वरील विवेचनावरुनअसे स्पष्ट होते की, तर्कतीर्थ जातिसंस्थाविषयक शारीरिक मानवशास्त्रीय (आधुनिक वंशशास्त्र) दृष्टीकोन नाकारतात व ते जातिसंस्थेकडे सांस्कृतिक मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहतात.

**जातिभेद दृढ होण्याची कारणे :**

तर्कतीर्थ म्हणतात, ''जातिसंस्था व चातूर्वर्ण्य व्यवस्था वेदकाळी निर्माण झाली यात शंका नाही, परंतु वेदकालीन चातवर्ण्य व जातिभेद आणि वेदोत्तरकालीन चातुर्वर्ण्य व जातिभेद यात फरक दिसतो. वेदोत्तरकाली जातिभेद अधिक दृढ झाला.''(जोशी; १९८२:३८३)

पुरोहितवर्ग वर्चस्वामुळे जातिसंस्थेला बळकटी मिळाली हे डॉ. मुरंजन यांचे मत तर्कतीर्थ निःसंशय मान्य करतात. (जोशी; १९८२:३६५)तसेच शुद्र वर्ण व आर्य त्रैवर्णिक यांच्यामध्ये बराच काळ टिकलेल्या सांस्कृतिक आंतरामुळेही जातिभेदाला तीव्रता प्राप्त झाली, असा दावा तर्कतीर्थ करतात. वर्ण परिवर्तन होण्याची क्रिया मंदावत गेल्यामुळे व बंद पडल्यामुळे जातिभेदाचा पाया रचला गेला. हीपरिवर्तनाची क्रिया बंद पडण्याचे प्रमुख कारण 'ग्रामसंस्थेस पोषक ग्रामोद्योगांची वंशपरंपरागत स्थिरता' हे होय. त्या-त्या प्रदेशात स्थिरावलेल्या ग्रामसंस्थामध्ये व्यवस्थितरित्या जगण्यासाठी सामाजिक कर्माची वा व्यवसायांची वाटणी होत असताना त्या त्या कर्माचे कौशल्य ज्या सामाजिक गटात असते तो तो गट आपली जीविका त्या कर्मातून निर्माण होते, म्हणून त्या कर्माला चिकटून राहतो. त्यामुळे जातिसंस्थेला बळकटी मिळते, असे तर्कतीर्थ सांगतात. (जोशी; १९५१:११३-११४)

भारतीय संस्कृतीत राष्ट्राला किंवा समाजाला सर्व बाजूने वेढणारी राजकीय संघटना प्राप्त झाली नाही. इतर संस्कृतीत प्रत्येक नागरिक आपत्काळचा सैनिक असतो. भारतीय संस्कृतीत लहानशा क्षत्रियवर्गाशिवाय इतर बहूसंख्य जमातींना व वर्गांना ही जाणीव कधीच नव्हती. येथेक्षत्रियत्व हा सर्वधर्म मानला नव्हता, त्यामुळे जातिभेद दृढावला. असे मत तर्कतीर्थ व्यक्त करतात. (जोशी; १९५१:११८-११९)

**जातिसंस्थेचे परिणाम व तर्कतीर्थांची भूमिका :**

तर्कतीर्थांच्या मते, 'जातिसंस्था ही प्राचीन भारतीय संस्कृती टिकविण्याच्या सामाजिक विशिष्टप्रयत्नांचे व्यक्तस्वरुपहोय. मानवाच्या उच्च प्रगल्भ दशेत आलेल्या अनेक प्राचीन संस्कृतीपैकी'भारतीय संस्कृती' ही एक होय; आणि आपली ही संस्कृती अबाधित राखण्याचे श्रेय येथील जातिसंस्थेला द्यावे लागेल.' (जोशी; १९८२:३४८) असे असले तरीजातिसंस्थेमुळे हिंदू समाजात उत्पन्न झालेल्या वैगूण्याची जाणीव तर्कतीर्थांना होती. तर्कतीर्थ म्हणतात, जातिसंस्थेमुळे प्रत्येक जातीतील व्यक्तीच्या स्वातंत्र्यास व नैसर्गिक महत्वाकांक्षेस मर्यादा पडल्या. व्यक्तीच्या नैसर्गिक योग्यतेला संकुचित क्षेत्रातच बंदिस्त व्हावे लागले. शुद्राला सर्वात खालचा सामाजिक दर्जा असल्यामुळे त्याच्यावर ऋणाचा भाग इतरांच्या पेक्षा अधिक होता. यामुळे श्रमजीवी जीवनाचा महिमा वाढला नाही. सुसंस्कृतव बुद्धीचा विकास झालेले वर्गसामान्यतःऔद्योगिक कलांच्या पासून दूर राहिले. या गोष्टीचा भारतीयांच्या बौद्धिक व आर्थिक विकासावर विपरित व अनिष्ट परिणाम झाला. (जोशी; १९५१:११७)रोटीबंदी, बेटीबंदीयासारख्या शृंखलात भारतीय समाजसंस्था सापडल्यामुळे येथे सर्वव्यापी मैत्रीची वाढ झाली नाही. नागरिक बंधुत्वाचे नाते दृढझाले नाही. परिणामी राजकीय एकत्व वृद्धिंगत होऊ शकले नाही. (जोशी; १९५१:११८-११९)

भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्यता पाळली जात होती.अस्पृश्यता हे जातिव्यवस्थेचे एक मोठे वैगुण्य होते. अस्पृश्य जातीच्या व्यक्तीचे दर्शन व संभाषण हेही प्रायश्चित्तार्ह मानले जाई. स्मृतीवाङ्मयात व पुराणवाङ्मयातचांडाल जातीची अस्पृश्यता वर्णिली आहे. त्याआधारे ज्या व्यवसायांचा मळ व मृत प्राणी वा त्याचा अवयव यांच्याशी संबंध आहे ते व्यवसायकरणारे अस्पृश्य मानले गेले. महाराष्ट्रात महार, मांग, चांभार, बुरुड, धोबी, ढोर या जाती अस्पृश्यमानल्या गेल्या. त्यांचीवस्ती गावाच्या बाहेर असे. विशिष्ट कामाकरिताच त्यांना गावात प्रवेश असे. त्यांचा स्पर्श, सावलीअपवित्र मानली गेली. (जोशी; १९८२:३६०-३६१)म्हणजे एकप्रकारे त्यांच माणूसपणच नाकारल गेलं. अस्पृश्यांचे प्रश्न, त्यांचे राजकीय हक्क व योग्यप्रतिनिधित्व यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९३२ मध्ये अस्पृश्यांसाठी विभक्त मतदारसंघाची मागण केली. या मागणीमुळे अस्पृश्यांचा प्रश्न ज्वलंत स्वरुपात सर्वांसमोर आला. महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणाची चळवळ सुरु केली. यासंबंधात त्यांनी परंपरावादी व परिवर्तनवादी अशा दोन्ही पंडितांची मते अजमाविली. परंपरावादी शास्त्रीपंडित मनुस्मृती, स्मृतीवाङ्मय, पुराणवाङ्मय इत्यादींचा आधार घेऊन अस्पृश्यतेचे समर्थन करीत होते. त्यावेळेस तर्कतीर्थांनी वेदामध्ये कोठेही अस्पृश्यतेचा निर्देश नाही. धर्माचे तत्वज्ञान व मूल सिद्धांत पाहिल्यास त्यात अस्पृश्यतेला मुळीच आधार नाही, अशी भूमिका घेतली. (चव्हाण; २०१०:६२-६५)

तर्कतीर्थ म्हणतात, 'गेल्या दीडशे वर्षातील धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या आंदोलनामुळे सामाजिक व धार्मिक सुधारणेचे पाऊल पुढे पडत आहे. कायद्याच्या क्षेत्रावर याचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो.कायद्यानेसतीची व बालविवाहाची चाल बंदपाडली. कायद्याने विधवाविवाह मान्य झाला. घटस्फोटाचा हक्क स्त्री-पुरुषांना कायद्याने प्राप्त झाला. हिंदू, बौध्द व जैन यांची आंतरजातीय लग्ने कायदेशीर ठरली. कायद्याने स्त्रियांना संपत्तीचा वारसा हक्क पुरुषांसमान मिळाला. कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाली आणि सर्व जाती व धर्म यांचे सहभोजन समाजमान्य झाले. दीडशे वर्षापूर्वीच्या हिंदू समाजाच्या रुढी व कायदे आणि विद्यमान हिंदू समाजाच्या रुढी व कायदे यांच्यात जमीन-अस्मानाइतकी तफावत पडली. याचे श्रेय भारतातील व महाराष्ट्रातील धर्मपरिवर्तनाच्या आंदोलनाला आहे.' (जोशी; १९८२:३४६) केवळ अस्पृश्यता प्रकरणाच्या संदर्भातच नव्हेतर तत्कालीन समाजजीवनातील अनेक सामाजिक प्रश्नासंबंधीची तर्कतीर्थांनी मांडलेली मते त्यांची सुधारकीवृत्ती स्पष्ट करतात, पण जातिव्यवस्थेतील वैगूण्ये ज्ञात असताना देखील ती व्यवस्था समूळ उखडून टाकण्यास ते धजावत नाहीत; किंवा जाती नष्ट करण्यासाठी ठोस पर्याय देताना दिसत नाहीत; किंबहूना जातिसंस्थेच्या उत्पत्तीसंबंधी समाजशास्त्रज्ञ, विद्वान, अभ्यासक, धर्मग्रंथ व पुराणग्रंथ काय म्हणतात याची चर्चा तर्कतीर्थ करतात,पण जाती नेमक्या कशा निर्माण झाल्या, जाती-जातींतील उच्च-नीच्यता योग्य की, अयोग्य याबाबत तर्कतीर्थ ठोस भूमिका मांडताना दिसत नाहीत. ते म्हणतात, 'चातुर्वर्णाचे चित्रच अत्यंत अस्पष्ट आहे. हिंदू समाजाच्या जातिव्यवस्थेचा व चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा विचार करताना मनू इत्यादी स्मृतीग्रंथाचा आधार घेण्याने फारच फसवणूक होण्याचा संभव आहे. त्याकरिता जातीजमातींचा इतिहास तपासला पाहिजेआणि विद्यमान जातिजमातींच्या उच्चनीच व्यवस्थेचे तपशीलवार स्वरुप काय आहे तेही तपासले पाहिजे. ते वारंवार बदलत गेले हेही लक्षात ठेवले पाहिजे.'

**संदर्भ सुचीः**

१. चव्हाण रा.ना. (संपा.), २०१०, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी(परंपरा, प्रबोधन व परिवर्तन), पुणे, रा.ना.चव्हाण प्रतिष्ठाण.
२. जोशी लक्ष्मणशास्त्री, १९५१, वैदिक संस्कृतीचा विकास, वाई, प्राज्ञपाठशाळा मंडळ.
३. जोशी लक्ष्मणशास्त्री, १९८२, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह - खंडपहिला, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
४. जोशी लक्ष्मणशास्त्री, १९८४, हिंदूधर्माची समीक्षाआणि सर्वधर्मसमीक्षा, वाई, प्राज्ञपाठशाळा मंडळ.
५. टिकेकर अरुण (संपा.), २०००, शहर पुणे एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा...खंड दुसरा, पुणे, निळूभाऊ लिमये फौंडेशन.
६. सुमंत यशवंत आणि पुंडे द.दि. (संपा.), १९८८, महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, पुणे, प्रतिमा प्रकाशन.